**Shikshan Sanshodhan : Journal of Arts, Humanities and Social Sciences** ISSN: 2581-6241 Volume - 4, Issue - 2, Feb- 2021
Monthly, Peer-Reviewed, Refereed, Indexed Journal Impact Factor: 3.871
Received on : 15/02/2021 Accepted on : 27/02/2021 Publication Date: 28/02/2021

# स्त्री शिक्षणाची विचारधारा: फुले दाम्पत्य

**डॉ. सविता ज्ञानेश्वर वावगे**
**सहयोगी प्राध्यापक व मराठी विभागप्रमुख,**
**श्री. मुक्तानंद महाविद्यालय गंगापूर, जि. औरंगाबाद**
Email - wawgesavita@gmail.com

**सारांश:** 'व्यक्तीला भोवतालच्या परिस्थितीचे यथार्थ आकलन होणे हे शिक्षणाचे प्राथमिक प्रयोजन आहे'. भ्रामक समजुती व अंधश्रद्धा अशा यथार्थ आकलनाच्या आड येतात सबब त्याचे निराकरण शिक्षणातूनच झालेच पाहिजे आपल्या वाट्याला आलेले दारिद्य, दास्य दुःख अपमान घृणा तिरस्कार व अज्ञान याची जोपर्यंत जाणीवच माणसाला होणार नाही तोपर्यंत कारणमीमांसा करण्याची त्याला बुद्धी होणार नाही. आणि ती त्याला करावीशी वाटली तरी त्यासाठी लागणारी कुवतही त्याच्यापाशी असणार नाही. या सर्वांसाठी आपल्या गतजन्मीच्या कर्मनांच तो बोल लावीत बसणार. शिक्षणाद्वारे त्याला या अनिष्टांची जाणीव होईल, त्याची कारणे मनुष्य निर्मितीन आहेत हे त्यांच्या लक्षात येईल, आणि मग त्या कारणांचे निरसन करून घेण्याची त्याला प्रेरणा मिळेल अशी ज्योतीरावांची अपेक्षा होती. अशा प्रकारे आत्मभानाची व आत्मविश्वासाची ज्योत व्यक्तीच्या मनात शिक्षणाखेरीज अन्य कशानेही पाजळू शकत नाही. अशी ज्योतीरावांची धारणा होती.

**मुख्य शब्द:** तालीबानी, दहशदवाद, मनुस्मृती, शुद्रातिशुद्र,अंतर्विरोध, वर्णाश्रमधर्म, उर्मी, ज्ञानोदय.

आज स्त्रियांचे शिक्षण किती महत्त्वाचे आहे हे पटवून देत असतांना आपल्याला फुले दाम्पत्यांच्या कार्याची भूमिका समजून घेणे खूप महत्त्वाचे आहे. सावित्रीबाई व ज्योतिबांचे विचार आजही आपल्यापर्यंत पोहचत आहेत किंवा पोहचण्याची गरज आहे. हे दोन व्यक्तिमत्व नाहीत तर ती एक विचारधारा आहे. आणि हिच विचारधारा आपल्याला जिवंत ठेवण्याचे कार्य करायचे आहे. समाजामध्ये परिवर्तन जर घडवून आणायचे असेल तर त्यांच्या विचारधारेशी प्रामाणिक राहणं खूप महत्त्वाचा आहे.

खरे पाहता भारतामध्ये मातृसत्ताक कुटुंब पद्धती होती. प्राचीन भारताची ती वास्तव संस्कृती होती. त्यामुळेच प्राचीन भारत वैभवशाली होता. गौतम बुद्धांनी केलेल्या परिवर्तनाने बहुजनांचे साम्राज्य अर्ध्या आशिया खंडात पसरले चंद्रगुप्त मौर्य ते सम्राट अशोक यांनी आपल्या राज्यकारभाराने आशिया खंड जिंकला. सम्राट अशोकाचा नातू बृहद्त्त सिंहासनावर आला. त्याच्या सर सेनापती पुष्य मित्रशुंगाने त्याची निर्घुणपणे हत्या केली. आणि तो भारताचा सर्वेसर्वा झाला. पुष्य मित्र शुंग म्हणजे आजच्या परिभाषेत सांगायचे म्हणजे तालीबानी दहशदवादच. पुष्यमित्र शुंगाने सुचिता भार्गव यांच्या कडून निदर्य अशा मनुस्मृती ग्रंथाची निर्मिती केली. शुद्रांवर आणि स्त्रियांवर अमानुष असे निर्बंध घातले आणि स्त्री स्वातंत्र्य संपुष्टात आले. स्त्रीयांचा अमानुष अशा अत्याचाराला प्रारंभ झाला.

पुरुषाने सर्वत्र असावे परंतु स्त्रीयांनी कोठेच नसावे असा असमान न्याय देणाऱ्या अन्यायी मनुस्मृतीचे थैमान संपूर्ण भारतात सुरू झाले. चूल आणि मूल या परिघाबाहेर स्त्रीयांनी पडू नये यासाठी मनुस्मृतीने काटेकोर निर्बंध घातले. स्त्रियांनी ज्ञानार्जन करणे हे धर्मबाह्य आहे. आणि तो दखलपात्र गुन्हा आहे हे बहुजनांच्या मनावर धर्म संस्कृतीच्या गोंडस नावाखाली बिंबवण्यात आले त्यामुळे स्त्रीयांच्या वाट्याला शोषण,अन्याय,अत्याचार,गुलामगिरी,बालविवाह आणि वैधव्य आणि असहाय्य कष्ट आले. स्त्रियांची या गुलामगिरीतून मुक्तता व्हावी यासाठी दोन हजार वर्षात असंख्य प्रयत्न झाले. पण त्याला यश प्राप्त झाले नाही. पण स्त्रियांना खऱ्या अर्थाने बंधमुक्त करून त्यांच्या जीवनाला प्रतिष्ठा मिळवून देण्याचे काम १९ व्या शतकात क्रांतीसुर्य राष्ट्रपिता ज्योतिराव फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी केले. कारण या सर्व अमानुष पद्धती विरुद्ध बंड केले ते फुले दाम्पत्य यांनीच, त्यांच्यामुळेच भारतातील महिलांना शिक्षणाची संधी मिळाली.

बहुजनांना मनुवाद्यांच्या गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी ज्योतिराव फुले यांनी ब्राह्मणांच्या विरुद्ध क्रांतिकारक आंदोलने सुरू केले. सर्वत्र बहुजनांना न्याय, समता, स्वातंत्र्य ,हक्क आणि अधिकार मिळावेत यासाठी ज्योतीरावांनी प्रखर जनआंदोलन उभारले. भूमिपुत्रांना हक्क आणि अधिकार मिळावेत यासाठी शिक्षण हेच महत्त्वाचे शस्त्र आहे. त्यासाठी त्यांनी १ जानेवारी १८४८ रोजी भारतातील पहिली मुलींची शाळा सुरू केली. त्यानंतर त्यांनी एक समिती स्थापन केली.

आणि दोन दलितांसाठी शाळा सुरू केल्या तसेच पुण्यात एकूण २० शाळा सुरू केल्या. सहाजिकच स्त्री शिक्षिका मिळत नसल्यामुळे सावित्रीबाईंनी शिक्षिका म्हणून काम सुरू केले. त्यांनी सर्व त्रास, अपमान, शिव्या सहन करून ज्योतीरावांना ठामपणे साथ दिली. सत्यशोधक समाजाच्या स्थापनेपासूनच मुलींना शिक्षण देणे हे समाजाचे ध्येय होते १८८२ मध्ये हंटर शिक्षण आयोगापुढे सादर केलेल्या निवेदनात फुले म्हणतात की, "सरतेशेवटी मला शिक्षण आयोगाला एक विनंती करायची आहे की, त्यांनी स्त्रियांमध्ये प्राथमिक शिक्षणाचा प्रसार आणखी मोठ्या प्रमाणात होईल अशा प्रकारच्या उपाययोजना संमती द्यावी"

शूद्रांना व स्त्रियांना शिक्षण मिळावे हे ज्योतीबांच्या सामाजिक कार्याचे एक अत्यंत महत्त्वाचे अंग होते. खरे म्हणजे शिक्षण हे एकोणिसाव्या शतकाच्या सामाजिक परिसरात रुजायला लागले होते. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या सहाय्याने देशाला ताकद मिळते असा विचार होण्याचा तो काळ होता. याच बरोबर स्त्री शिक्षण हा समाज सुधारणेच्या चळवळीमधला एक महत्त्वाचा कार्यक्रम झाला. ब्राह्मो समाज, आर्य समाज, यापासून ते महाराष्ट्रातील धोंडो केशव कर्वे पर्यंत समाजसुधारकांनी शाळा, शिक्षण, संस्था, कॉलेज, सुरू करण्याचा कार्यक्रम हाती घेतला होता. समाजसुधारणेच्या या सर्व प्रवाहांमध्ये जोतिबांचे वेगळेपण काय होते. हे समजून घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. शूद्र-अतिशूद्र मुलींना शिक्षण देऊ पाहणारे ज्योतीबा फुले आणि मध्यमवर्गीय उच्च जातीय, भद्रलोक या प्रकारच्या घरातील मुलींच्या शिक्षणासाठी प्रयत्न करणारे सुधारक यांच्या शिक्षण देण्याविषयीच्या एकूण भूमिकेमध्ये फार फरक होता.

ब्रिटिश राज्य स्थापन झाल्यावर नवीन इंग्रजी शिक्षण सुरू झाले. या शिक्षणातून उच्च जातीतला नवशिक्षित वर्ग पुढे येऊ लागला. या वर्गाला पुरुष शिक्षणाच्या संदर्भात नवा विचार करू लागले, नवीन जीवन पद्धती सुरू करायला लागले. परंतु त्या काळात स्त्रियांना शिक्षणाची संधी उपलब्ध न झाल्यामुळे पारंपारिक विचारांच्या पगड्यामुळे त्यांच्या जीवनात अंतर्विरोध निर्माण होऊ लागला. त्यांच्यामध्ये एक प्रकारचा असंतोष निर्माण होऊ लागला. रवींद्रनाथ टागोर यांनी हा असंतोष व्यक्त केला आहे. "आपण जर स्त्री शिक्षणाचा प्रसार केला नाही तर नवशिक्षित भारतीय समाजामध्ये नवरा-बायको मधला सुसंवाद नामशेष होईल" काहींना स्त्रियांच्या दुय्यम स्थाना विषयी त्यांच्यावर होणाऱ्या अत्याचाराबद्दल राग येऊ लागला. काहींना सती सारख्या महाभयंकर परंपराविषयी विषयी घृणा वाटू लागली पण बहुतेक समाजसुधारकांचा स्त्री शिक्षणाचा प्रसार करण्यामागचा हेतू एवढाच होता की, नवरा-बायकोमध्ये सुसंवाद रहायला पाहिजे. सुप्रसिद्ध समाजशास्त्रज्ञ श्रीमती वीणा मुजुमदार या हेतुचे चांगले विश्लेषण करतांना दिसतात त्या म्हणतात "शिक्षण स्त्रियांना त्यांच्या कौटुंबिक भूमिका बजावणापासून दूर वळविणार नाही उलट ते बायका आणि आया म्हणून त्यांची कुवत वाढवेल आणि समाजावरील पारंपरिक मूल्यांचा पगडा मजबूत करील कारण स्त्रिया या मूल्यांच्या इतरापेक्षा चांगल्या वाहक आहेत."

स्त्रियांना शिक्षण दिले तर त्या वर्णाश्रमधमी विरोधी किंवा पतिव्रत्याविरोधी आवाज उठवतील असे या भद्रलोक ब्राह्मणांना अजिबात वाटत नव्हते, या उलट जोतिबांची शिक्षण विषयक भूमिका अत्यंत वेगळी होती. शिक्षण म्हणजे बहुजन समाजाच्या, स्त्रियांच्या, दलितांच्या मुक्तिलढ्याचे पहिले पाऊल, शिक्षण म्हणजे समाज क्रांतीची तयारी असा त्यांचा दृष्टिकोन होता.

कष्टकऱ्यांना शिक्षण मिळाले म्हणजे त्यांना माणूस म्हणून उभे राहण्याचे साधन मिळते. जग, समाज समजण्यासाठी साधने मिळतात. आवाज उठविण्यासाठी, लढा देण्यासाठी हत्यार मिळते,अशी त्यांची धारणा होती. फुल्यांच्या ऐतिहासिक विश्लेषणाप्रमाणेच हिंसाचाराच्या जोरावर आर्यभट्ट यांनी 'लुटारू समाज' सुरू केला होता. ही समाजव्यवस्था स्थिर करण्यासाठी व मूळ बहुजन समाज खाली दाबण्यासाठी खोट्या धर्मग्रंथातील फसवणूक वापरली होती. शूद्रातिशूद्र समाजाला मुद्दाम अज्ञानात ठेवले होते. त्यामुळे त्यांच्या दृष्टीने शूद्रातिशूद्र व स्त्रियांना मुक्त करणाऱ्या लढ्यातले पहिले पाऊल साहजिकच शिक्षणाचेच होते. त्यांना त्या माध्यमातून जागृत करायचे होते. त्यांनी उच्च शिक्षणपेक्षा प्राथमिक शिक्षणावर जास्त जोर दिला, आणि हे शिक्षण सर्व मुली-मुलांना मिळाले पाहिजे अशी स्पष्ट भूमिका घेतली. बहुजन समाजात शिकण्याबद्दल उर्मी आहे, आणि शिक्षण मिळाले तर शूद्र-अतिशूद्र व स्त्रिया अन्यायाविरोधी लढ्यात संघटित होणार अशी त्यांची अपेक्षा होती.

अज्ञान हे गरिबी व शोषणाचे मूळ कारण आहे. मुलींना व स्त्रियांना शिक्षण दिले तर त्या धार्मिक फसवणूकीविषय जागृत होणार, गरिबीला शह देण्याची ताकद निर्माण होणार व अन्याय अत्याचार विरोधी आवाज उठवणार असे त्यांना वाटत होते. पण शेवटी जेव्हा कुटुंबातल्या व समाजातल्या स्त्रियांच्या गुलामगिरीची तीव्रता त्यांच्या लक्षात आली तेव्हा स्त्रियांचे गुलामगिरी विरुद्ध बंड स्त्रियांचा मुक्तीलढा असा आपोआप होणार नाही, त्यासाठी खास कार्यक्रम घ्यावे लागणार हे त्यांच्या लक्षात आले.

'व्यक्तीला भोवतालच्या परिस्थितीचे यथार्थ आकलन होणे हे शिक्षणाचे प्राथमिक प्रयोजन आहे'. भ्रामक समजुती व अंधश्रद्धा अशा यथार्थ आकलनाच्या आड येतात सबब त्याचे निराकरण शिक्षणातूनच झालेच पाहिजे आपल्या वाट्याला

आलेले दारिद्य, दास्य दुःख अपमान घृणा तिरस्कार व अज्ञान याची जोपर्यंत जाणीवच माणसाला होणार नाही तोपर्यंत कारणमीमांसा करण्याची त्याला बुद्धी होणार नाही. आणि ती त्याला करावीशी वाटली तरी त्यासाठी लागणारी कुवतही त्याच्यापाशी असणार नाही. या सर्वासाठी आपल्या गतजन्मीच्या कर्मनांच तो बोल लावीत बसणार. शिक्षणाद्वारे त्याला या अनिष्टांची जाणीव होईल, त्याची कारणे मनुष्य निर्मितीन आहेत हे त्यांच्या लक्षात येईल, आणि मग त्या कारणांचे निरसन करून घेण्याची त्याला प्रेरणा मिळेल अशी ज्योतीरावांची अपेक्षा होती. अशा प्रकारे आत्मभानाची व आत्मविश्वासाची ज्योत व्यक्तीच्या मनात शिक्षणाखेरीज अन्य कशानेही पाजळू शकत नाही. अशी ज्योतीरावांची धारणा होती.

शिक्षणातून कशी जाणीव जागृती साध्य होते याचे सुंदर उदा. धनंजय कीर यांनी फुले चरित्रात नमूद केले आहे. ज्योतीराव व सावित्रीबाईंनी सुरू केलेल्या मुलींच्या शाळेत शिकणारी एक मांगाची मुलगी 'महार मांगाची अवनत अवस्था' या विषयावर लिहिलेल्या आपल्या निबंधात काही मूलभूत प्रश्न उपस्थित करते असे हे उदा. आहे. तिच्या म्हणण्याचा आशय असा आहे की, "वेदावर ब्राह्मण लोक मक्ता सांगतात इतरांना त्याचा अभ्यास करू देत नाही. तेंव्हा वेद जर फक्त त्यांचेच असतील तर त्यांनीच आपल्या रोजच्या जीवनात ते अनुसरावेत. आम्हाला धर्मग्रंथांचा अभ्यास करण्याचे स्वातंत्र्य नाही याचा अर्थ उघडच असा आहे की, आम्हाला धर्मच नाही. तेव्हा हे इश्वरा तूच आम्हाला सांग की, ब्राह्मण जसा त्यांचा धर्म आचरतात तसा आम्ही आचरणात आणावा असा कोणता धर्म तू निर्माण केला आहेस? हा ऐवढा समजूतदारपणा शिक्षणानेच त्या मुलीच्या ठिकाणी निर्माण केला होता. व्यक्तीला सत्य आणि असत्य यातील फरक समजावा, शब्दप्रामाण्यांतून तिची सुटका होऊन चिकित्सक दृष्टिकोन तिला लाभावा आणि वर्तमानाचे तिला यथार्थ ज्ञान यावे ही शिक्षणाची प्रयोजने ज्योतीरावांनी सांगितली असली तरी केवळ व्यक्तिनिष्ठ सांध्यापूरतीच ती मर्यादित असणे त्यांना मान्य नव्हते. आत्मसुखार्थ ज्ञानाचे संगोपन करणे याखेरीज अधिक व्यापक प्रयोजन जर शिक्षणाला नसेल तर ते शिक्षण स्थितीवादी किंवा प्रतिगामी ठरणे अटळ ठरते याची ज्योतीरावांना जाणीव होती.

लोकहिताच्या आणि सामाजिक प्रगतीच्या दृष्टीने त्या ज्ञानार्जनाचा उपयोग व्यक्तीच्या व समाजाच्या दैनंदिन जीवनात व्हायलाच पाहिजे, त्यातून जिवनाला दिशा मिळाली पाहिजे. आणि चरित्राची जडणघडण झाली पाहिजे, असा त्यांचा कटाक्ष होता. शिक्षणातून व्यक्तींना नैतिक सहजीवन साध्य व्हायचे तर त्यासाठी समाजातील सर्वांना सहज प्रेरणांच्या पातळीवरून वर उठून बौद्धिक क्षमतांच्या पातळी जगण्याची संधी मिळालीच पाहिजे. कुणीही माणूस इतर कोणाचे साधन म्हणून वापरला जाता कामा नये. शोषणाचे साधन म्हणून शिक्षणावर मूठभरांची मिरास राहू नये. मोजक्या लोकांच्या विशेष ज्ञानवेत्तेपेक्षा समाजातील सर्वांच्या अंगी स्वतंत्र्य विचार करण्याच्या क्षमतेचा व निर्णय शक्तीचा शिक्षणातून विकास होणे या उद्दिष्टाला अग्रक्रम मिळायला पाहिजे. स्वातंत्र्य, समता, बंधुता व सामाजिक, आर्थिक, न्याय यावर आधारलेल्या एक समाजरचनेचे आदर्श चिंतन ज्योतीरावांनी केले होते. आणि हे आदर्श चिंतन प्रत्यक्षात उतरविण्याचे समर्थ साधन म्हणून त्यांनी शिक्षणाचा विचार केला होता.

शिक्षणाच्या यासंदर्भात अग्रक्रम ठरवितांना कोणाचे शिक्षण व कोणते शिक्षण अधिक महत्वाचे मानले जावे? त्या शिक्षणाचा आशय कसा असावा? माध्यम कोणते असावे? त्याची संरचनात्मक जडणघडण कशी असावी? याबद्दलचे विवेचन जसे ज्योतीरावांनी केले आहे. त्याचप्रमाणे शासनाचे शैक्षणिक धोरण तत्कालीन शिक्षण प्रणालीतील त्रुटी,विकृती, अध्ययन-अध्यापन व्यवस्थेतील सुधारणेची दिशा वगैरे बाबींचाही मूलगामी विचार त्यांनी मांडला आहे. गुलामगिरी ग्रंथाची प्रस्तावना शेतकऱ्यांचा आसूड, सार्वजनिक सत्यधर्म, हंटर शिक्षण आयोगापुढे सादर केलेले निवेदन या त्यांच्या लेखनातून ज्योतीरावांचे शिक्षणविषयक विचार मुख्यत्वे व्यक्त झाले आहे. तसे तर शिक्षण हा त्यांचा निधीध्यास असल्यामुळे ते जे जे बोलले किंवा त्यांनी जे काही लिहिले त्या शब्दा शब्दातून आणि केलेल्या प्रत्येक कार्यातून त्यांचे शिक्षणविषयक तत्वज्ञान प्रकट झाले आहे.

ज्योतीराव,सावित्रीबाई यांनी उपेक्षितांचा शिक्षणार्थ निस्वार्थ बुद्धीने केलेल्या या खटाटोपाची योग्य प्रकारे दखल 'ज्ञानोदय' यासारखे वृत्तपत्र तर घेतच होती, पण सरकार दरबारी ही त्याची नोंद झाली होती. त्यावेळच्या शिक्षण मंडळाचे (बोर्ड ऑफ एज्युकेशन) जे अहवाल उपलब्ध आहेत त्यात या दांपत्याचा गौरव करणारे अनेक उल्लेख आढळतात. विशेषतःस्त्री शिक्षणाच्या क्षेत्रात त्या दोघांनी जी कामगिरी केली त्यासाठी जो त्याग आणि कष्ट केले त्यांच्या शैक्षणिक कार्याची महती आणि माहिती मुंबईच्या राज्यपालांकरवी लंडन मधील कंपनी सरकारला समजली सरकारने त्याचा त्या प्रीत्यर्थ सन्मान केला, स्त्रीयांच्या हक्कासाठी उद्धारासाठी अखंड झुंजणारा व झिजणारा स्त्रीयांचा कैवारी म्हणून या प्रसंगी सर्व इंग्रजी मराठीतील वृत्तपत्रांनी त्यांचा गौरव केला.

शिक्षणाद्वारे व्यक्तीचे कर्तृत्व बहरास यावे, मन संवेदनक्षम व्हावे, ज्ञानाची क्षितिजे विस्तारावीत आणि तिला प्रतिष्ठेचे व अभिरुचीपूर्ण 'मानवी' जीवन जगणे शक्य व्हावे, हे तर त्यांना अभिप्रेत होतेच, पण त्यांच्यामते समाजपरिवर्तन किंवा नवमूल्यांवर आधारीत नवसमाज निर्मिती हेच शिक्षणाचे खरे आणि अंतिम प्रयोजन होते. शिक्षणाच्या क्षेत्रात काही प्रगती

झालेली नाही, असे मला मुळीच म्हणायचे नाही संख्या, प्रमाण आणि प्रकार या तिन्ही दृष्टींनी अमाप वाढ झाली आहे. शैक्षणिक संस्था, विद्यार्थी संस्था, शिक्षकांची संस्था कितीतरी पटीने वाढली आहे. शिक्षणावर होणाऱ्या खर्चातही भर पडली आहे. शिक्षण प्रसार अभूतपूर्व प्रमाणावर घडून आला असून शिक्षणाच्या परिघाबाहेर राहिलेल्या कित्येक घटकापर्यंत प्रथमच शिक्षण पोहचले आहे. त्यांच्या मधून नव शिक्षितांची पिढी उभी राहिली असून सामाजिक चळवळीची धुरा आज तिने शिरावर घेतलेली आढळते. प्राथमिक, माध्यमिक, व उच्च शिक्षणाच्या. नेहमीच्या संस्थाच्याच जोडीलाच विद्यापीठ अनुदान मंडळ, भारतीय सामाजिक शास्त्र, अनु संशोधन परिषद, विभागीय अभियांत्रिकी महाविद्यालये एन. सी. ई. आर. टी., आय.आय.टी., आय.आय.एम., आय.आय.एम, राष्ट्रीय प्रयोगशाळा, विद्यापीठांशी संलग्न वा स्वातंत्र्य विविध विषयांची प्रगत अध्ययन केंद्र अशा प्रतिष्ठा-प्राप्त व जागतिक कीर्तीच्या संस्थांचीही उभारणी स्वातंत्र्योत्तर काळात झाली आहे. स्वातंत्र्य, सामाजिक न्याय व समान संधी यावर आधारित न्यायोचित समाजरचना निर्मितीचे साधन म्हणून शिक्षणाकडे पहिल्या पंचवार्षिक योजनेचा आराखडा तयार करताना विद्वानांनी पाहिले आहे. पाचव्या पंचवार्षिक योजनेच्या मसुदयातही आर्थिक विकास व समाजाचे आधुनिकीकरण करण्यात शिक्षणाला महत्त्वाची भूमिका पार पाडायची आहे. अशी धारणा व्यक्त केली आहे.

आजपर्यंत शिक्षण हा सतत व सार्वत्रिक चर्चेचा विषय ठरला आहे. अनेक आयोग आले, प्रयोग झाले, नवनवीन धोरणे आली, सध्या आपण १९८६ चे राजीव गांधीप्रतणी धोरण राबवित आहोत पण. तरीही इथल्या शिक्षणात कोणते मूलभूत व संघटनात्मक बदल घडून आलेले नाहीत. उलट हे शिक्षण दिवसेंदिवस अनुत्पादक, निरर्थक होत चालले आहेत. समाज परिवर्तना ऐवजी समाजातील सर्वांगीण विषमता कायम राखण्यासाठीच या शिक्षणाचा उपयोग होत आहे. त्याचा खरा लाभ समाजातल्या शहरी व ग्रामीण सुखवस्तू घटकांनाच होतो.

नव्या शैक्षणिक धोरणानुसार 'ऑपरेशन' खडू फळा मोहीम सुरू आहे. इलेक्ट्रॉनिक साधनांचा शैक्षणिक वापरही वाढत्या प्रमाणावर होऊ लागला आहे. व्यावसायिक शिक्षणाचाही बोलबाला आहे. आयात केलेले 'तंत्रज्ञान' आणि शैक्षणिक 'तत्वज्ञान' कोणत्याही देशाचे भले कसे करू शकेल हा लाखमोलाचा प्रश्न बाजूला ठेवला तरी हे शिक्षण कोणत्या मूल्यांचा संस्कार विद्यार्थावर करते? या प्रश्नांची मात्र उपेक्षा करून भागणार नाही. ज्योतीरावांनी मांडलेल्या अनेक मुद्यांशी समांतर मुद्दे नवीन शैक्षणिक धोरणात शोधून त्या आधारे ज्योतीरावांचे दूरदर्शीत्व सिद्ध करण्याचा प्रयत्न काही अभ्यासकांनी केला आहे. पण याचाच अर्थ असा होतो की, ज्योतीराव म्हणाले तेच पुन्हा म्हणण्याची पाळी जर आली असेल तर मधली संपूर्ण वाटचाल विफल ठरली आहे. शिक्षण प्रसाराचा सामाजिक गरजांशी संबंधच उरलेलाच नाही. शिक्षण प्रक्रियेतून विशेषतः उच्च शिक्षणातून पुढे आलेला हा नवा ब्राम्हण वर्ग पारंपरिक ब्राह्मण वर्गा इतकाच समाजद्रोही ठरलेला बघतांना ज्योतीरावांचे शब्द फिरवून 'एका विद्येने केवढे हे अनर्थ केले' असे उद्गार नकळत पणे जिभेवर येतात.

## संदर्भग्रंथ सूची:

१. महात्मा ज्योतीराव फुले - धनंजय कीर
२. युगपुरुष महात्मा ज्योतीराव फुले - बा. ग. पवार
३. महात्मा - डॉ. रवींद्र ठाकूर
४. महात्मा फुले साहित्य आणि चळवळ – संपा. हरी नरके
५. महात्मा फुले आणि धर्म - आ.ह. साळुंखे
६. व्यक्ती आणि विचार - य.दि. फडके
७. आम्ही पाहिलेले फुले – हरि नरके
८. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले – मा.गो. माळी
९. म. फुले चरित्र – पंढरीनाथ पाटील